**Journal of East-West Thought**
**ISSN:** ***2168-2259 (online)***
***(https://jetjournal.us/)***
**Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1**

**Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I**

# डॉ बाबासाहेबांच्या दृष्टीने धम्म : सामाजिक समतेसाठी नवा पर्याय

**श्री. ईश्वर हिलाल ढिवरे**, संशोधक विद्यार्थी, जि. प. शाळा अंजनविहीरे ता. शिंदखेडा जि. धुळे.
**प्रा. डॉ. रवींद्र एम. साळुंके**, संशोधन मार्गदर्शक, महिला महाविद्यालय नंदुरबार

**प्रास्ताविक :**

14 एप्रिल 1891रोजी जन्मल्यापासून ते 13 ऑक्टोबर 1956 पर्यंत संपूर्ण आयुष्य हिंदू धर्मात घालवल्यानंतर14 ऑक्टोबर 1956 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे पूज्य 'भंते महास्थवीर चंद्रमणी' यांच्याकडून माईसाहेब सविता आंबेडकर यांच्या समवेत, हजारो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्याला प्रमुख कारण होते, विषमतेवर आधारित कर्मठ जातीव्यवस्था.

**जातीव्यवस्था :**

डॉ. बाबासाहेब त्यांच्या 'मूकनायक' या पक्षिकाच्या पहिल्या अंकात भारतातील जातीव्यवस्थेचे वर्णन करताना तिला मनोऱ्याची उपमा देताना लिहितात की " हिंदुस्थान हा देश म्हणजे केवळ विषमतेचे माहेरघर आहे. हिंदू समाज हा एक मनोरा आहे. व त्यातील एकेक जात म्हणजे एक एक मजला आहे. महत्वाची गोष्ट म्हणजे या मनोऱ्याला शिडी नाही. म्हणजेच एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात जो जन्माला त्याच मजल्यात त्याने मरावे. खालच्या मजल्यातील मनुष्य कितीही लायक असला तरी त्याला वरच्या मजल्यात जाण्यास प्रवेश नाही. तसेच वरच्या मजल्यातील माणूस किती नालायक असला तरी खालच्या मजल्यावर लोटून देण्याची व्यवस्था नाही"[1]

जातीव्यवस्थेचा अभ्यास करताना त्यांनी 'भारतातील जाती ' ( कास्ट इन इंडिया )या विषयावर शोध निबंध लिहिला व तो पुस्तक रूपाने प्रसिद्ध केलेला आहे.

जाती व्यवस्था ही माणसाच्या असमानतेवर आधारलेली आहे. माणसाच्या जन्मापासून जातीच्या नावाने त्याच्याशी असमान व्यवहार सुरू होतो. जातिव्यवस्थेने माणसांना चार हजार पेक्षा जास्त संख्येने विभाजित केले आहे. त्यांचे विभाजन हे क्रमिक असमानतेवर असल्याने कोणत्याही दोन जातींचा दर्जा हा समान नसतो. तो उतरंडीनुसार खालून वर पाहिले असता सन्मान वाढवणारा आणि वरून खाली पाहिले असता खालच्या जातींच्या संदर्भानी तिरस्कार निदर्शनास येतो.

**जातीव्यवस्थेचा परिणाम :**

डॉ.बाबासाहेबांचा पूर्वजांचा धर्म हा हिंदू धर्म होता. ते देखील हिंदू धर्माच्या चौकटीत राहून लहानाचे मोठे झाले. जातिव्यवस्था हा हिंदू धर्माचा गाभा आहे. बाबासाहेब अस्पृश्य जातीतून जन्माला आल्यामुळे लहानपणापासून त्यांना जातीव्यवस्थेचे चटके सहन करावे लागले.सामाजिक अवहेलनांना तोंड द्यावे लागले. त्यांच्या जीवनातील विविध घटनांनी त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला.

प्राथमिक शिक्षणापासून ते उच्चशिक्षणापर्यंत, नोकरीच्या ठिकाणी, तसेच सामाजिक जीवनात त्यांना जातीव्यवस्थेमुळे अपमान पचवावा लागला.

त्यांच्या धर्मांतरला प्रामुख्याने दोन कारणे होती.एक म्हणजे ज्या धर्मामुळे अस्पृश्य म्हणून अपमानित व्हावे लागते, त्या धर्माचा त्याग करणे दुसरे कारण म्हणजे सामाजिक समतेच्या दृष्टिकोनातून माणूस म्हणून सर्वांना समान समजणारा बुद्धाचा विचार व त्याचा धम्म यांचा अंगीकार करणे.


**Copyright © | JET Network, All Rights Reserved**

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

**बाबासाहेबांच्या जीवनातील बुद्धांसंदर्भात ठळक घटनाक्रम :**

1. डॉ.भीमराव रामजी आंबेडकर हे जेव्हा मॅट्रिक परीक्षेत यशस्वी झाले. तेव्हा महाराष्ट्रातील नामांकित समाजसुधारक सिताराम केशव बोले यांच्या अध्यक्षेखाली झालेल्या समारंभात गुरुवर्य कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी स्वतः लिहिलेले बुद्धाचे मराठी चरित्र भीमरावांना भेट म्हणून दिले[3].
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक चळवळीसाठी काढलेल्या 'मूकनायक', 31 जुलै 1920, तसेच 3 जून 1927 सालच्या 'बहिष्कृत भारताचा अग्रलेख' वृत्तपत्रातून बाबासाहेबांनी बुद्धाच्या महत्त्वपूर्ण कार्याची ओळख करून दिली होती.
3. महाड येथे असताना बाबासाहेब आणि त्यांचे सहकारी बुद्धकालीन लेणी पहावयास गेले होते. त्या लेण्या पाहून आपल्या सोबत्यांना बाबासाहेबांनी बुद्धाच्या धर्मप्रचाराचे व समाजसेवेचे कार्य समजावून सांगितले होते. त्या संदर्भातील वर्णन गंगाधर निळकंठ सहस्त्रबुद्धे यांनी केलेले आहे[4]
4. 25 सप्टेंबर 1928 रोजी मुंबईतील दादर गणेशोत्सव प्रसंगी भाषणात बाबासाहेब म्हणतात "अस्पृश्यतेचा उगम जातीभेदातूनच झाला आहे,जातिभेदावर कुऱ्हाड घालून अस्पृश्यतेचे पाप मुळातच मारून टाकणारा खरा जर एखादा धर्मवीर आपल्या देशात अवतरला असेल तर तो एकटा गौतम बुद्ध होय"
5. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष असलेल्या समता संघाने ' समता 'हे पाक्षिक चालवले होते. या पाक्षिकातून देखील वेळोवेळी बुद्धाच्या ऐतिहासिक सामाजिक क्रांतीचे दाखले दिलेले आढळतात.
6. 13 ऑक्टोबर 1935 रोजी येवला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली होती.
7. 30 व 31 मे 1 व 2जून 1936 रोजी अखिल मुंबई इलाखा महार परिषद आयोजित केली होती.त्यात '31मे 1936'रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मुक्ती कोण पथे'[6] या त्यांच्या प्रसिद्ध भाषणात मुक्ती बुद्ध विचारांच्या मार्गानेच होईल असे स्पष्टपणे सांगून 'अत्त दीप भव' ! "स्वयंप्रकाशित व्हा"हा बुद्धाचा संदेश अधोरेखित करतात.
8. 17 मे 1941 च्या जनता वृत्तपत्राच्या अंकात "बुद्ध जयंती आणि तिचे राजकीय महत्त्व" या अग्रलेखात त्रिशरण गमन करण्याचा सल्ला दिलेला आहे.
9. 1944 साली मद्रासच्या दौऱ्यावर असताना 24 सप्टेंबर 1944 आपल्या भाषणात त्यांनी प्राचीन हिंदुस्तानातील क्रांती व प्रतिक्रांती विषयी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. त्यात बुद्धाने केलेली क्रांती ही सर्वंकष क्रांती होती असे ते ठामपणे सांगतात.
10. '16 जानेवारी 1949 रोजी बाबासाहेब आणि माईसाहेब यांच्या स्वागत सभा मंडपाच्या दर्शनी मध्यभागीच गौतम बुद्धाची प्रतिमा ठेवली होती. 'क्रांतीचे चक्र आपणच फिरवू' या आशयाचे बौद्ध संकेत देणारे प्रभावी भाषण केले होते.
11. 2 मे 1950 रोजी नवी दिल्ली येथे बुद्ध जयंती निमित्ताने अनेक राष्ट्रांचे राष्ट्रदूत व बौद्ध भिक्खू तसेच 20 हजार बौद्ध विचार समर्थक यांच्या समोर भाषण करताना त्यांनी बुद्धाची जयंती साजरी करण्याचा संदेश दिला.
12. 20 मे 1951 रोजी नवी दिल्ली येथे फ्रान्सचे राजदूत यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. त्यात बुद्धाचा विचार हा जातीअंताचा विचार असल्याचे डॉ.बाबासाहेबांनी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

नमूद करताना जातीप्रथा नष्ट करायची तर बौद्ध धम्म स्वीकारण्याचा पर्याय देखील दिला. जातीभेद निर्मूलन सोबतच युद्ध विरहित जागतिक शांततेचे बीज बुद्ध तत्त्वज्ञानात आहे असे त्यांनी स्पष्ट केले.

13. 15 फेब्रुवारी 1953 रोजी इंडो- जपान सांस्कृतिक संघटनेचे सचिव श्री.मूर्ती व त्यांच्या पत्नीच्या सत्कार प्रसंगी बाबासाहेब उपस्थित होते. त्याप्रसंगी भाषण करताना जगापुढे आता दोनच मार्ग उपलब्ध आहेत बुद्ध किंवा मार्क्स . बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा, त्याचा शांततेचा मार्ग स्वीकार केला नाही तर कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा विजय होण्याचा धोका असल्याने बुद्ध विचारांचा जेवढा प्रचार होईल तेवढा करावा असे सुचवले होते[7].
14. '26 मे 1953 रोजी मुंबईच्या नरे पार्कवर बुद्ध धम्म प्रचार समितीतर्फे बुद्ध जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी "मी एक बौद्ध धम्माचा उपासक आहे. मी,बुद्धांकडून बोध घेऊन केवळ बोलतच नाही तर प्रत्यक्ष कृती करून दाखवणार". या पुढील आयुष्य मी बुद्ध धर्माच्या प्रचारात खर्च करण्याचे निश्चित ठरवले आहे असे मनोगत व्यक्त केले.
15. 1954 मध्ये आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रावरून बोलताना ते म्हणाले "माझे जीवनविषयक तत्त्वज्ञान तीन शब्दात सामावलेले आहे. स्वातंत्र्य,समता आणि बंधुभाव. हे मी माझे गुरु भगवान बुद्ध यांच्या शिकवणीतूनच घेतले आहे.फ्रेंच राज्यक्रांतीवरून माझे जीवनविषयक तत्त्वज्ञान उसने घेतले आहे असे मात्र कोणी समजून नये. माझ्या तत्त्वज्ञानाचे मूळ राजकारणात नसून धर्मात आहे. या त्यांच्या स्वीकारोक्तीने त्यांच्या चळवळीचे अधिष्ठान बौद्ध विचारधाराच होती हे स्वयंस्पष्ट होते[8].
16. रंगून येथे 4 डिसेंबर 1954 रोजी तिसरी जागतिक बौद्ध परिषद भरली होती. त्यात त्यांनी बुद्ध धम्माच्या प्रचाराचा दृढ संकल्प व्यक्त केला होता. भारतात परत आल्यावर रंगूनहुन आणलेल्या बुद्ध मूर्तीचे पुण्याजवळील देऊरोड येथील नवीन बांधलेल्या बुद्धविहारामध्ये अनावरण केले[9].
17. 14 जानेवारी 1955 रोजी वरळी येथे आयोजित सभेत त्यांनी स्पष्ट केले की उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत असताना त्यांनी तेथे बौद्ध धम्माचा बराच अभ्यास केला. त्यांना इतर धर्म आणि बौद्ध धर्म यातील फरक जाणवले.
18. 10 जून 1956 रोजी नवी दिल्लीत आंबेडकर भवनाच्या पटांगणात झालेल्या कार्यक्रमात " स्वतंत्र वृत्तीचे निर्भय नागरिक व्हा" हा संदेश देताना "निसर्गता माणूस स्वतंत्र आहे. कोणत्याही गोष्टीचा स्वीकार करताना तो आंधळेपणाने करू नका. सद्सद् विवेक बुद्धीचा विचार करून निर्णय घ्या".असे सांगितले.
19. 23 जून 1956 रोजी बुद्ध जयंती निमित्ताने दिल्लीत झालेल्या सभेत बौद्ध धम्माचा ऱ्हास ची कारणे स्पष्ट करताना बौद्धांवर झालेल्या अत्याचारांविषयी ऐतिहासिक दाखल्यांच्या आधारे माहिती दिली[10].
20. 23 सप्टेंबर1956 च्या प्रबुद्ध भारत या पत्रात त्यांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूर येथे धर्मांतर करण्याची जाहीरात केलेली दिसते

**बाबासाहेबांचा धर्माविषयीचा दृष्टिकोन :**

धर्म हा परिस्थितीनुरूप मानवी हिताची दूरदृष्टी ठेवून नेहमी गतिशील असला पाहिजे. तो कोणत्याही परिस्थितीत स्थितीशील असता कामा नये. मानव जसा जसा प्रगत होत जाईल त्यासोबतच धर्माची तत्वे प्रगत होत राहिली पाहिजे. धर्माची तत्वे ही माणूस केंद्रबिंदू ठेवून लवचिक व वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित असली पाहिजे ही भूमिका बाबासाहेबांची धर्माच्या बाबतीत होती.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

न्यायी व समताधिष्ठित समाजासाठी धर्म आवश्यक आहे. मनुष्य केवळ अन्नावर जगू शकत नाही. त्याला मनही आहे ज्याला विचारांचे खाद्य पाहिजे असते. धर्म हा मानवी कृतींना चालना देणारा असतो. समानता व असमानता, शोषण व परोपकार यासारख्या विविध भावनांचे मूळ मानवी मनात आहे. राजकीय, सामाजिक,आर्थिक बदल यशस्वी होण्यासाठी प्रत्येक नागरिकांच्या मनात बदल होणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते.

**धर्म आणि धम्म :**

समाजाची धारणा ज्याच्यामुळे होते तो धर्म असे सर्वसाधारणपणे म्हटले जाते. पण बाबासाहेब म्हणतात, "व्यक्तीच्या जीवनाला समाजाची जरी आवश्यकता असली तरी समाजाची धारणा हे धर्माचे एकमेव ध्येय होऊ शकत नाही. व्यक्तीचा विकास हेच खरे धर्माचे ध्येय आहे. व्यक्तीच्या आत्मोउन्नती साठी पोषक वातावरण निर्माण करणे. ही धर्माची मूलभूत संकल्पना आहे. ज्या धर्मात स्वातंत्र्य, समता, आणि बंधुत्व ही मूल्ये असतील तोच धर्म श्रेष्ठ होय". अशी स्पष्ट भूमिका बाबासाहेबांची होती.[11]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्म आणि धम्म याच्यामध्ये मूलभूत फरक केलेला दिसतो. परमेश्वराचे अस्तित्व मानून त्याला प्रसन्न करून घेण्यासाठी केल्या जाणाऱ्या पूजा विधि, व्रतवैकल्य आधारित पुनर्जन्म, स्वर्गनर्क वगैरे संबंधित काल्पनिक नियमांना धर्म असे म्हटले. ईश्वरवादी धर्मात माणूस आणि ईश्वरांचा संबंध केंद्रस्थानी असतो, तर माणूस आणि माणूस यांचा संबंध दुय्यम किंवा आनुषंगिक असतो. त्यामुळे त्या त्या व्यक्तीचा धर्म, म्हणजे त्या त्या व्यक्तीच्या उपासना पद्धतीद्वारा येणारा ईश्वराशी सुटा सुटा संबंध, म्हणून धर्म वैयक्तिक बाब मानता येते.

धम्माची व्याख्या करताना त्यांनी वैयक्तिक व सामाजिक नीति म्हणजेच धम्म असे म्हटले आहे.

धम्मात मात्र माणूस आणि माणूस यांच्यातला याच जगातला सदाचाराचा, मैत्रीचा, प्रेमाचा संबंध केंद्रस्थानी असतो. देव,दैव,परलोक या कल्पनांना स्थान नसून नीती हीच प्रथमस्थानी असते[12]

**बुद्ध विचार प्रेरणेतून धम्म स्वीकार :**

प्रतीत्य समुत्पाद - प्रतीत्य म्हणजे प्रत्यय तर समुत्पाद म्हणजे उत्पन्न होणे. ह्याच्या प्रत्ययाने हे उत्पन्न होते. कार्यकारण भाव म्हणजे कोणतीही गोष्ट कारणाशिवाय घडत नाही. या कारणाने हे घडते ते सांगणारा सिद्धांत म्हणजे प्रतीत्य समुत्पाद सिद्धांत होय.[13]

जे मानवाला अनुभवता येत नाही किंवा ज्याचे अस्तित्व सिद्ध करता येत नाही अशा कोणत्याही गोष्टीवर बुद्धाचा विश्वास नव्हता. बौद्ध धम्म कोणताही अनाकलनीय गोष्टींना स्थान नाही. ज्या वस्तूंची माणसाला जाणीव होऊ शकेल. ज्यांच्या विषयी बोलू शकेल, ज्यांना स्पर्श करू शकेल, आणि ज्यांची माणूस निर्मिती किंवा नाश करू शकेल अशाच वस्तू किंवा गोष्टींविषयी बुद्धाने उपदेश केला आहे बुद्धाचा प्रतीत्य समुत्पाद हा सिद्धांत वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित होता.

**धम्म स्वीकारण्याबाबत अनुयायांचे प्रबोधन :**

दिनांक 13 ऑक्टोबर 1935 येवला येथे मुंबई इलाखा परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून प्रबोधन करताना अस्पृश्य वर्गाला डॉ. बाबासाहेब यांनी सांगितले की "हिंदू धर्मात आपला समान दर्जा प्रस्थापित करण्यासाठी सत्याग्रहाच्या मार्गाने जाऊन आपल्याला काही मिळणार नाही. आपल्याला व समाजाला समतेचे स्थान मिळवण्याकरता धर्माचा त्याग करणे हाच एकमेव पर्याय असल्याचे स्पष्ट केले.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

हिंदू धर्मात जन्म घेतल्याचा डाग आपल्या प्रगतीत आड येत आहे. आपल्या साऱ्या मानहानीचे तसेच सवर्ण हिंदूंचे आमच्या बाबतीत तुच्छतापर वर्तनाचे हेच एकमेव कारण आहे. "मी हिंदू म्हणून जरी जन्माला आलो, तरी हिंदू म्हणून मी मरणार नाही[14] धर्मांतराची ही घोषणा बाबासाहेबांनी या सभेतच केली होती.

1935 ते 1956 या 21 वर्षाच्या कालावधीत बाबासाहेबांनी विविध धर्मग्रंथांचा अभ्यास केला. हिंदू धर्मियांचे मत परिवर्तनासाठी विविध कार्यक्रम घेतले. अस्पृश्य समाजासोबत समतेने वागण्याचे आव्हान केले. बाबासाहेबांनी सामाजिक समतेचा आग्रह धरला होता. जर का हिंदू समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वावर अस्पृश्यना सामावून घेतले तर, हिंदू धर्मात एकरूप होऊन धर्मांतराचा विचार सोडून देण्याचे बाबासाहेबांनी आपल्या 'समता' या वृत्तपत्रात महोदय व्यक्त केला होता.[15] पण त्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही.

हिंदू धर्म सामाजिक न्यायाच्या विरुद्ध आहे याची खात्री झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना नवा धर्म निवडण्याची आवश्यकता निर्माण झाली.

वरील ठळक संदर्भांनी बाबासाहेबांची बुद्ध धम्म स्वीकारण्याची मानसिकता तयार झाली होती. असे स्पष्टपणे जाणवते.त्यांनी आपल्या अनुयांना सांगितले, "मी बुद्ध धम्म स्वीकारणार ! तुम्हाला पटला तर स्वीकारा! आतापर्यंत हिंसक मार्गाने व अमानुष अत्याचाराच्या जोरावर बुद्ध धर्माची लाट परतवून लावली परंतु आता बुद्ध धर्माची लाट येईल ती कधीही परतणार नाही".[16]

भारताच्या सांस्कृतिक परंपरेचा भाग म्हणून त्यांनी बौद्ध धर्माची निवड केली. तसेच आपल्या अनुयायांना धम्म स्वीकारण्याविषयीचे प्रबोधन केले.भ. बुद्धाच्या संघटनेत काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या मी दूर करण्याचा प्रयत्न करणार आहे असे देखील त्यांनी आश्वासन दिले .

**बुद्ध विचाराचे निकष :**

बौद्ध जीवन तत्वे हे प्रामुख्याने त्रिपिटीकात उपलब्ध असून काही बौद्ध गाथांमध्ये देखील आढळतात. या तत्त्वांमध्ये परस्पर विसंगती देखील आढळून येते. त्या विसंगतीतून बुद्धांचे विचार कसे अधोरेखित करायचे या जटील समस्येवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी काही प्रमुख निकष ठरवलेले होते. त्यापैकी

1. बुद्ध हा बुद्धीप्रामाण्यवादी होता , म्हणून बुद्धीला पटणारे विचार हेच बुद्धाचे असावेत. ज्या विचारांना तर्क ची कसोटी लागत नसेल. ते विचार बुद्धाचे नसावेत.
2. बुद्ध हा लोक कल्याणकारी विचारसरणीचा मार्गदाता असल्याने लोकांच्या कल्याणाशी असलेलेच विचारच बुद्धाचे असले पाहिजे. जे विचार लोककल्याणाचे नसतील ते विचार बुद्धांच्या महापरीनिर्वाणा नंतर, किंवा धम्माच्या अधोगतीच्या काळात कुणीतरी बुद्धाच्या नावाने घुसळलेले असावेत.
3. बुद्ध विचारसरणीचे दोन भाग स्पष्टपणे जाणवतात एक म्हणजे बुद्धाचे एखाद्या घटना प्रसंगातील निश्चित स्वरूपाचे तात्विक विचार. दुसरे म्हणजे एखाद्या घटना प्रसंगात निश्चित भूमिका घेतली नाही. परंतु अशा अनिश्चित बाबींच्या संदर्भात बुद्धांनी तर्काला अनुसरून असलेल्या विचारांना मान्यता दिली असती. अशा निकषांच्या आधाराने बाबासाहेबांना बुद्ध तत्त्वज्ञानाची नवमांडणी करून पुनर्रचना करायची होती.[17]


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**निष्कर्ष :**

बुद्ध आणि त्याचा धम्म" मध्ये बाबासाहेब म्हणतात "बुद्ध हा समतेचा महान पुरस्कर्ता होता" भारतीय व पाश्चात्य विद्वानांनी देखील बुद्ध हा भारताचा सर्वश्रेष्ठ पुरुष असल्याबद्दल निर्विवाद मान्य केले आहे.[18]

बाबासाहेबांनी निरनिराळ्या धर्मग्रंथांचा तौलनिक अभ्यास केल्यानंतर बौद्ध धम्म हाच व्यक्तीच्या विकासासाठी आणि सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी पोषक असा धर्म आहे अशी त्यांची पक्की खात्री झाली. म्हणून 14 ऑक्टोबर 1956 साली त्यांनी आपल्या हजारो अनुयायांसह 'अत्त दीप भव' म्हणजे स्वयंप्रकाशित व्हा ! असा संदेश सांगणाऱ्या बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. आपल्या अनुयांकडून त्यांनी स्वतः निर्माण केलेल्या 22 प्रतिज्ञा वदवून घेत भारतीय समाजाला सामाजिक समतेसाठी नवा पर्याय उपलब्ध करून दिला.

**संदर्भ ग्रंथ** :


1. कीर धनंजय:- डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई 2024/1945 पा.नं -49
2. कठेरिया कमल किशोर : भारतीय संस्कृतीचे पुनर्लेखन अस्मितांचा संघर्ष, प्रकाशक डि.के खापर्डे मेमोरियल ट्रस्ट, मुंबई, जून 2016 पान नंबर 68
3. उपरोक्त :कीर धनंजय पान नंबर 27
4. बहिष्कृत भारत 03/02 / 1928
5. मून वसंत आणि संपादक मंडळ-डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड18 भाग1 डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन मुंबई,ऑक्टोबर 2002 पृ.152
6. जनता 20/06/1936
7. आंबेडकर भीमराव रामजी : बुद्ध आणि त्यांचा धम्म, प्रकाशक बुद्ध आणि त्यांचा धम्म सोसायटी ऑफ इंडिया, ऑक्टोबर 2006, फोन नंबर 10
8. उपरोक्त: बुद्ध आणि त्यांचा धम्म, पान नंबर 9
9. उपरोक्त : कीर धनंजय पान नंबर 535
10. प्रबुद्ध भारत :21 जुलै 1956
11. पवार दया आणि संपादक मंडळ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.2024 पान नंबर 232
12. उपरोक्त गौरव ग्रंथ पान नंबर 253
13. विकिपीडिया
14. खैरमोडे चांगदेव भवानराव- डॉ.भीमराव रामजी आंबेडकर.खंड 6.सुगावा प्रकाशन पुणे, एप्रिल 2017 पृ.118
15. उपरोक्त :कीर धनंजय, पान नंबर 181
16. मून वसंत आणि संपादक मंडळ-डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड18 भाग 3 डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन मुंबई,ऑक्टोबर 2002 पृ.470



Copyright © | JET Network, All Rights Reserved

17. उपरोक्त :गौरव ग्रंथ पान नंबर 244
18. साळुंखे आ.ह.-सर्वोत्तम भूमिपुत्र : गोतम बुद्ध, लोकायत प्रकाशन, सातारा, सप्टेंबर 2014 पान नंबर 49


Copyright © | JET Network, All Rights Reserved